महाराष्ट्र विधानसभा

तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यात रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत

(१) १५८ (२५-०४-२०२५). श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत कोणत्याही व्यक्तीचे १८ वर्षापेक्षा अधिक वय असलेल्या २६२ प्रकारच्या कामांमधून रोजगार पुरविला जात असून यामध्ये शंभर दिवसापर्यंत रोजगाराच्या हमी केंद्र शासनानंतर राज्य शासनाकडून दिली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०२४-२५ मध्ये लाखो मंजूर कामे असताना माहे डिसेंबर, २०२४ अखेर त्यातील केवळ हजारो कामे पूर्ण झाली असून त्याचे प्रमाण केवळ १३.३ टक्के असून, ८६.७ टक्के कामे अपूर्णावस्थेत असल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील रोजगार हमी योजनेची अपूर्ण कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत २६६ प्रकारची कामे घेतली जातात.

(२) हे अंशतः खरे आहे.

मगांराग्रारोहयो अंतर्गत आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये नरेगासॉफ्ट वरील अहवालानुसार १८.०५% कामे पूर्ण झालेली आहेत.

(३) काही कामांचा पूर्ण होण्याचा कालावधी हा एक वर्ष ते तीन वर्ष असतो. अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरिता वैयक्तिक लाभाची योजना घेणाऱ्या लाभार्थ्यांना काम पूर्ण करण्याबाबत प्रोत्साहित करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

मौ.सुत्रकार (ता.तलासरी जि.पालघर) येथील गट क्र.३४३/१९ या जमिनीवर बेकायदा गौणखनिज उत्खनन केले जात असल्याबाबत,

(२) ५५५ (२९-०४-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.सुत्रकार (ता.तलासरी जि.पालघर) डोंगरीवाडा येथील गट क्र.३४३/१९ या जमिनीवर विनापरवाना गौणखनिज उत्खनन केले जात असल्याचे सहाय्यक उपजिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी तसेच प्रांत कार्यालय, डहाणू यांच्याकडे दिनांक २८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्या दरम्यान तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३१-१०-२०२५) : (१) व (२) दिनांक १७.१२.२०२४ रोजी सहायक जिल्हाधिकारी, डहाणू व दिनांक १८.१२.२०२४ रोजी तहसिलदार, तलासरी यांना "मौजे सुत्रकार (ता. तलासरी, जि. पालघर) डोंगरीपाडा येथील गट क्र. ३४३/९ या जमिनीवर विनापरवानगी उत्खनन होत असल्याबाबत तक्रार प्राप्त झाली. त्यानुषंगाने केलेल्या चौकशीत स.नं.३४३/९ मधील खाण / क्रशर लोकवस्तीपासून ५० मीटरचे आत असल्याचे व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील दिनांक २०.०९.२०२४ मधील अटी / शर्तीनुसार Shedule-II-B Control Measures मधील तरतुदीचा भंग झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून आल्याने उत्खनन प्रक्रीया बंद ठेवण्याबाबत संबंधितांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील हजेरी सहाय्यकांची सेवा शासकीय सेवेत सामावून घेण्याबाबत

(३) १७२१ (२५-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत हजेरी सहाय्यकांना ज्याधर्तीवर नागपूर विभागातील ४०६ हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत सामावून घेतले त्याच धर्तीवर कोकण विभागातील सहाय्यकांना सामावून घेण्याबाबत वेळोवेळी शासनाकडे निवेदने सादर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागणीनुसार पाठपुरावा व अनेक आंदोलने करुनही शासनाचे दुर्लक्ष झाले आहे तसेच तत्कालीन सिंधुदुर्ग जिल्ह्याचे मा.पालक मंत्री यांचेकडे श्री.श्रीकांत म.गुरव व अन्य अन्यायग्रस्त हजेरी सहाय्यक यांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोकण विभागात रोजगार हमी योजनेंतर्गत हजेरी सहाय्यक म्हणून वर्षानुवर्षे काम केले त्यांना डावलून ज्यांनी एक दिवस काम केले त्यांना उप जिल्हाधिकारी तथा उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांना सामावून घेतल्यासंदर्भातील नियोजन विभागीय अधिकाऱ्यांनी कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच राज्यातील हजेरी सहाय्यकांची दिनांक १ ऑक्टोबर, १९८८ पासूनची सेवा नियमित करुन सेवा विषयक सर्व लाभ देणेबाबत माहे जानेवारी, २०२५ मध्ये ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना लोकप्रतिनिधी यांनी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन सदरहू निवेदनातील मागण्यांच्या अनुषंगाने हजेरी सहाय्यकांना विनाविलंब शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२८-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) सिंधुदूर्ग जिल्हयाचे तत्का. पालकमंत्री यांचेकडे दिनांक १२/१०/२०२३ रोजी श्री. श्रीकांत म. गुरव व अन्य यांनी सादर केलेले निवेदन जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग कार्यालयाकडे दिनांक २१/१२/२०२३ रोजी प्राप्त झाले आहे.

(३) नियोजन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर,१९९५ व दिनांक २१ एप्रिल,१९९९ अन्वये जे हजेरी सहायक दिनांक२६ मे,१९९३ ते दिनांक३१ मे, १९९३ या कालावधीत प्रत्यक्ष रोजगार हमी योजनेच्या कामावर कार्यरत होते त्यांना शासन सेवेत सामावून घेण्यात आले आहे.

(४) व (५) नाशिक जिल्हयातील लोकप्रतिनिधींनी ग्राम विकास विभागास नाशिक जिल्ह्यातील १६ हजेरी सहायकांची सेवा नियमित केली नसल्याने त्याबाबत कार्यवाही करण्याबाबत जिल्हा परिषद, नाशिक यांना निर्देश देण्याची विनंती केली आहे. त्यास अनुसरुन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नाशिक यांना नियमोचित कार्यवाही करण्याबाबत दिनांक२१/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात गाय गोठा योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान थकीत असल्याबाबत

(४) १८२६ (२६-०४-२०२५). श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना शेती बरोबरच इतर व्यवसाय करुन उत्पादनात वाढ करण्याकरीता शासनाने गाय गोठा योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त योजनेंतर्गत नांदगाव, मनमाड तालुक्यासह नाशिक जिल्ह्यातील शेकडो लाभार्थ्यांचे तब्बल ५९ कोटी ७० लाख रुपयांचे अनुदान थकीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन उक्त थकीत अनुदान तातडीने लाभार्थ्यांना वितरित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे खरे आहे

(२) अंशत: खरे आहे

नाशिक जिल्हातील सार्वजनिक व वैयक्तिक कामांचे एकुण रु.६२९५.४२ लक्ष ची देयके निधी अभावी प्रलंबित आहेत.

(३) केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असुन निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

केज (जि. बीड) तालुक्यात प्लॉटच्या खरेदी खताच्या आधारे फेरफार केल्याबाबत.

(५) २०६४ (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि. बीड) तालुक्यातील श्रीमती शोभा सतीषराव चिद्रवार यांनी येथील जमीन सर्व्हे नं. २२८/१ मध्ये नोंदणीकृत खरेदीखत नं. १०२४/१९८८ आधारे त्यांचे नाव महसूल अभिलेखात घेण्याबाबत तलाठी, केज यांच्याकडे वारंवार लेखी अर्जाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मागणी करूनही श्री. साईल ईनामदार, तलाठी, केज हयांनी त्यांचे नावे महसूल अभिलेखात फेरफार घेत नसल्याने त्याच्यावर कारवाई करुन फेरफार करण्याबाबतची मागणी श्रीमती चिद्रवार यांनी तहसीलदार, केज यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री साईल ईनामदार तलाठी, यांचे मूळ गाव हे केज असून त्यांनी स्थानिक राजकारणात सहभाग घेऊन पदाचा दुरुपयोग करुन नागरिकांना त्रास देत असून ते लोकांची कामेही करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कार्यवाही करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे दिनांक ०३ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०२५) : (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) संबंधित तलाठी यांचे मुळ गाव केज हे खरे आहे. त्यांचा स्थानिक राजकारणाशी संबंध नसल्याचे तसेच त्यांचेकडे येणाऱ्या नागरिकांशी ते सौजण्याची वागणूक देत असल्याचे चौकशीमध्ये दिसून आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.
(५) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम १० अन्वये,श्री. साहील ईनामदार, ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) केज यांचे विरुध्द जिल्हाधिकारी, बीड यांचे दिनांक१८.०८.२०२५ रोजीच्या आदेशन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे हरसुल, (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील सर्व्हे ५७/ ७५ ची मिळकत ही अवैधरित्या कुळाच्या नावे केल्याबाबत

(६) २३४० (२६-०४-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हरसुल (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील सर्वे नंबर ५७ व ७५ ही मिळकत वक्त संस्था दर्गाहजरत हुजूर शहा मस्जिद व कब्रस्तान टाऊन हॉल या संस्थेच्या सेवेसाठी इनाम म्हणून बहाल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मिळकतीला कुळ कायदा अधिनियमातील तरतुदी लागू नसताना देखील तत्कालीन तहसीलदार व प्रांताधिकारी यांनी संगनमताने चुकीचा निष्कर्ष काढून कुळांच्या नावे दाखल केला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महसूल न्यायाधिकरण यांचे तहसीलदार व प्रांत यांचेकडील आदेश रद्द झालेला असून व मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे उक्त जमिनीबाबत स्थगिती आदेश पारित असताना दुय्यम निबंधक कार्यालय व तहसील कार्यालय यांनी संगनमताने खरेदी विक्री व्यवहार केला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त जमिनी पुनर्स्थापित करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०२५) : (१) हे खरे नाही, मुळ अभिलेखावरुन सदर जमीन ही मदतमाश ईनाम असल्याचे दिसुन येत आहे.
महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७.०५.१९७३ रोजीच्या वक्फ बोर्डाच्या जमिनीच्या राजपत्रामध्ये सर्व्हे नं.५७ व ७५ हया गट नंबरची त्यामध्ये नोंद असल्याचे दिसून येत आहे.
(२) सदर जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर इतर हक्कात भवानी आहेलाजी-४ आणे, आसाराजी आहेलाजी-८ आणे व भोजु पिराजी-४ आणे म्हणून संरक्षित कुळाची नोंद कायम असल्याने तत्कालीन अपर तहसीलदार,छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक१५.१०.१९८४ अन्वये संरक्षीत कुळ घोषित केले आहे. तदनंतर उपजिल्हाधिकारी (भूसुधार), छत्रपती संभाजीनगर यांनी देखील तहसिलदार यांचे दिनांक १५.०१.१९८४ रोजीचे आदेश कायम केले आहेत.
(३) मौजे हर्सुल गट न.५७ व ७५ मध्ये बेकायदेशिररित्या जमीनीचे खरेदी विक्री व्यवहार होत असल्याच्या प्राप्त तक्रारीनुसार विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्या निर्देशावरुन जिल्हाधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी जिल्हा सह निबंधक यांना संबंधित दुय्यम निबंधक यांचेवर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच संबंधित ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांची सविस्तर चौकशी करण्याचा प्रस्तावावर कारवाई सुरु आहे.
(४) सदर प्रकरणी तत्कालीन अपर तहसिलदार छत्रपती संभाजीनगर व उपजिल्हाधिकारी, (भुसुधार) छत्रपती संभाजीनगर यांनी दिलेले आदेश मा. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी रद्द केले आहेत. मुळ कुळ धारक यांचे वारस यांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, औरंगाबाद यांनी दिलेल्या दिनांक १३.०३.२०१९ रोजीच्या निर्णया विरोधात मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट याचिका क्र.४३१२/२०१९ दाखल केली असुन मा.उच्च न्यायालयाने दिनांक १३.०३.२०१९ रोजीच्या आदेशास स्थगिती दिलेली आहे.
सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

धनेगाव (ता. केज, जि. बीड) येथील मांजरा प्रकल्पाजवळ शासनाने मत्स्य बीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबत

(७) २५८० (२९-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धनेगाव (ता. केज, जि. बीड) येथील मांजरा प्रकल्पाजवळ शासकीय मत्स्य बीज उत्पादन केंद्र असून उक्त केंद्र मागील दहा ते बारा वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मत्स्य बीज उत्पादन केंद्र सुरु करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मत्स्यव्यवसाय मंत्री महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. नितेश राणे (०३-१०-२०२५) : (१) धनेगाव (ता.केज, जि. बीड) येथील मांजरा प्रकल्पाजवळ, शासकीय मत्स्य बीज उत्पादन केंद्र, आयुक्त मत्स्यव्यवसाय यांच्या दिनांक१४/०२/२०२४ च्या आदेशान्वये भाडेपट्टीने देण्यात आले असून, सद्यस्थितीत मत्स्यबीज निर्मिती सुरळीत सुरु आहे.

(२) असे निवेदन अप्राप्त आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

औसा(जि.लातूर) तालुक्यातील भूकंप पुनर्वसन प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना जुन्या निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत

(८) २८५० (२७-०४-२०२५). श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औसा (जि.लातूर) येथील भूकंप पुनर्वसन प्रशिक्षण कार्यक्रमातंर्गत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्तीवेतन योजनेची शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी मागणीनुसार निवृत्तीवेतन योजनेची शासन निर्णयानुसार अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) भूकंप पुनर्वसन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत रोजंदारी / तासिका तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्त केलेल्या ट्रेनर / कर्मचाऱ्यांना वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०२.२०२४ नुसार जुनी निवृत्तीवेतन लागू करण्याबाबतचा परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडून प्राप्त झाला होता.

त्यानुसार शासन पत्र दिनांक २२.०७.२०२५ अन्वये, सदर कर्मचाऱ्यांची नेमणूक करताना कोणतीही पदभरती जाहिरात निर्गमित करण्यात आलेली नसल्याचे दिसून आल्याने, वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक ०२.०२.२०२४ मधील तरतुदी लातूर येथे झालेल्या भूकंपाच्या अनुषंगाने पुनर्वसनाच्या कामासाठी रोजंदारी / तासिका तत्त्वावरील कर्मचाऱ्यांना लागू होत नाहीत असे जिल्हाधिकारी, लातूर यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

लातूर जिल्ह्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत होणाऱ्या कामांची देयके वेळेवर अदा करण्याबाबत

(९) ३३३९ (२५-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील बेरोजगारी दूर करण्याबाबत तसेच विकासाची महत्त्वाची योजना असूनही या योजनेच्या अंमलबजावणीत अडचणी येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेच्या कामात विहीर बांधणे व गोठा उभारणे अशी विविध कामे करुनही लाभार्थ्यांना बांधकाम साहित्याचे ६९ कोटी रुपये मिळत नसल्याने ते आर्थिक अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामाची देयके वेळेवर अदा होत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त योजनेची अंमलबजावणी योग्यरीतीने होण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

(४) वैयक्तीक लाभाच्या योजनेमध्ये सिंचन विहिरी व जनावरांचे गोठे, या कामांचा कुशल निधी संबंधित लाभाथ्यौना वितरीत करण्यासाठी जिल्हा परिषद, लातूर कडून रक्कम रु. ९७.९८ लक्ष निधीची मागणी करण्यात आली आहे.
केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असुन निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पाथर्डी (जि.अहिल्यानगर) रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांचे प्रलंबित देयके देण्याबाबत

(१०) ४०४४ (२५-०४-२०२५). श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथर्डी (जि.अहिल्यानगर) तालुक्यात पंचायत समितीच्या माध्यमातून रोजगार हमी योजनेंतर्गत विहीरी व गायगोठ्यांची कामे मंजूर झालेली कामे शेतकऱ्यांनी मजुरांकडून करुन घेतली तथापि, तीन महिन्यांपासून मजुरांची देयके मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या पैशातून वा ऊसनवारी करुन ही कामे पूर्ण झाल्यानंतर अधिकाऱ्यांनी त्यांची देयके तयार करुन वरिष्ठ कार्यालयाकडे अनुदानाची मागणी केली असता अनुदान शिल्लक नाही, अनुदान आल्यावर देयके मिळतील असे अधिकाऱ्यांनी सांगितल्यामुळे मजूर व शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुदानाअभावी पंचायत समिती अंतर्गत कुशल, अकुशल व अर्धकुशल मजुरांचे तीन-चार महिन्यांची (सुमारे ३,१८,६३०००) कोट्यवधी रुपयांची देयके देणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगारी हमी योजनेंतर्गत प्रलंबित देयके देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

पंचायत समिती, पाथर्डी अंतर्गत रू.९,६७,४८६/- अर्धकुशल रक्कमेचे वितरण करण्यात आल्याने अर्धकुशल निधी प्रलंबित नाही.

(४) केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असुन निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

वाशिम जिल्ह्यात नवीन सिंचन विहीरीसाठी निधी वितरित करण्याबाबत

(११) ४३७४ (२५-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतजमीन सिंचनाखाली यावी यासाठी प्रशासनाकडून सिंचन विहीरीवर भर देऊन ४५८ नवीन सिंचन विहीरीची मागणी विभागीय आयुक्तांकडे केली असून यासाठी कोट्यवधी (५.७९) रुपयांची गरज असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मोठ्या प्रमाणात विहीरी खोदण्यात आल्या असून या योजनेला गती देण्यासाठी नवीन सिंचन विहीरीसाठी लागणाऱ्या निधीच्या प्रस्तावास मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) :

(१) हे अंशतः खरे आहे.

वाशिम जिल्हयातील ८६७ नवीन सिंचन विहिरींकरीता रक्कम रु.१०९५.२८ निधी मागणी प्रस्ताव वाशिम ज़िल्हामार्फत आयुक्त,महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर कार्यालयास सादर करण्यात आलेला आहे.

(२) सिंचन विहिरींकरिता बांधकामाच्या टप्प्यानुसार निधी उपलब्ध करून दिला जातो. सिंचन विहिरींचे बांधकाम २ वर्षाचे आत होणे अपेक्षित असते तद्नंतर आयुक्त,मनेरगा, नागपूर यांच्या स्तरावरून निधी मंजुर केला जातो.

केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असुन निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील भूजल सर्वेक्षण यंत्रणाद्वारे जमिनीतील पाण्याच्या पातळीबाबतचे सर्व्हेक्षण करुन गावांची यादी जाहीर करण्याबाबत

(१२) ४७९८ (२५-०४-२०२५). श्री.अमोल पाटील (एरंडोल) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेती पिकांना पाणी मिळून, आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी याकरिता शासनाच्या अनुदानातुन सुरक्षित क्षेत्रात (Safe Zone) वैयक्तिक सिंचन विहिरी मंजूर करुन देण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) तसेच एरंडोल (जि.जळगाव) येथे भूजल सर्वेक्षण यंत्रणाद्वारे सुरक्षित क्षेत्र (Safe Zone), गंभीर (Critical), अर्ध-गंभीर (Semi Critical), व अतिशोषित (Over Exploited) गावांची यादी दरवर्षी विविध विभागांना पाठविण्यात येत असूनही दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून ते ९ जुलै, २०२४ पर्यंत गावांमध्ये कोणताही बदल झालेला नसून वारंवार त्याच गावांची नावे दरवर्षी यादीत पाठविण्यात येत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनामार्फत जलदूत ॲपच्या माध्यमातून दरवर्षी मान्सून पूर्व व संपल्यानंतर सर्व्हेक्षण करुन माहितीच्या आधारे जमिनीतील पाण्याची पातळी लक्षात घेऊन यादी जाहीर करण्यात यावी, अशी मागणी स्थानिक

लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) :(१) हे खरे आहे.
(२) भूजल मूल्यांकन, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) आणि केंद्रीय भूमीजल मंडळ, नागपूर (CGWB) यांच्या सहकार्याने संयुक्तपणे करण्यात येते व त्यानुसार प्रक्रीया पूर्ण करुन याद्या संबंधितांना पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात येतात. (GSDA) आणि (CGWB) यांच्या सहकार्याने तयार केलेल्या सन २०२२-२३ च्या भूजल मूल्यांकन अहवालास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे.
(३) हे खरे नाही,
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

आमगांव (जि.गोंदिया) येथे रोजगार हमी योजनेंतर्गत प्रलंबित निधी मंजूर करण्याबाबत

(१३) ५०६२ (२५-०४-२०२५). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगांव (जि.गोंदिया) हे अतिदुर्गम, नक्षल प्रभावित, आदिवासी बहुल क्षेत्र असून येथील आदिवासी नागरिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी रोजगार हमी योजनेंतर्गत कुशल कामांकरिता निधीच उपलब्ध झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एका ग्रामपंचायतीला रोहयोच्या २० कामांच्या वर कामेच करता येत नाही त्यामुळे २० पेक्षा जास्त काम करताना ग्रामपंचायतीची वेबसाईट आपोआप बंद होते व त्यानंतर २१ वे काम ग्रामपंचायतीला घेता येत नसून अशा ३० ते ३२ ग्रामपंचायती आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेत काम केल्याचा पूर्णत्वाचा दाखलाही मिळत नसल्यामुळे स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणे अडचणीचे झाल्यामुळे रोजगार हमी योजनेंतर्गत प्रलंबित असलेला निधी शासन केव्हापर्यंत मंजूर करणार आहे,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुशल कामासाठीचा निधी उपलब्ध करून ग्रामपंचायतीला २० पेक्षा जास्त कामे घेण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
स्थानिक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी ३८८० कामे आमगाव तालुक्यात सेल्फवर असुन या कामामुळे निर्माण होणारे अंदाजीत मनुष्य दिवस ११ लक्ष आहे.
केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला असुन निधी वितरणाची बाब कार्यवाहीत आहे.
(४) व (५) २० पेक्षा जास्ती कामे केल्यास, कामांची निकड लक्षात घेवून सदर कामाला विशेष बाब म्हणुन कामे सुरू करण्याची परवानगी देण्याचे जिल्हा कार्यक्रम समन्वयक तथा ज़िल्हाधिकारी (सर्व) यांना अधिकार असल्याने.प्रश्न उद्भवत नाही.

नांदेड जिल्ह्यातील ग्रामीण रोजगार हमी योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

(१४) ५१७४ (२५-०४-२०२५). श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील लोहा पंचायत समिती अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेत बहुतांश गावात ४५८ कामांवर तर ५१४५ रोजगार कागदावर दाखवून मशीनद्वारे काम सुरु असून बोगस हजेरीपट भरुन गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करुन सदर समितीने चौकशी पूर्ण करुन आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन समितीच्या अहवालानुसार संबंधीत दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

पंचायत समिती व जिल्हास्तरावर कोणत्याही प्रकारची लेखी तक्रार प्राप्त नाही.

(२),(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शेतकऱ्यांना सिंचनासाठी विहीरी ऐवजी कुपनलिकेसाठी (बोअरवेल) अनुदान देण्याबाबत

(१५) ५५१४ (२७-०४-२०२५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना सिंचनासाठी धडक सिंचन विहीर कार्यक्रमांतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व भगवान बिरसा मुंडा सिंचन विहीर या योजनेतुन शेतात विहीर बांधकामासाठी रु.२.५० व रु.४.०० लक्ष अनुदान देण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचनाकरिता पाण्याची पातळी कमी होणे, विहीरी कोरड्या पडणे, सिंचनासाठी पाणी नसणे, लाभार्थी शेतकऱ्यांकडून सिंचन विहीरी ऐवजी कुपनलिकेसाठी (बोअरवेल) अनुदान उपलब्ध करणे इ. ची मागणी होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांच्या मागणीनुसार त्यांना सिंचनाकरिता विहीरी ऐवजी कुपनलिकेसाठी (बोअरवेल) अनुदान उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२९-१०-२०२५) : (१) हे खरे आहे,

दिनांक ०६.०२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांमध्ये १३००० धडक सिंचन विहिर कार्यक्रमांतर्गत रु.२.५० लक्ष अनुदान देण्यात येत आहे.

त्याव्यतिरिक्त कृषी विभागाच्या दिनांक ०१.१०.२०२४ च्या शासन निर्णयानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन व बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत नविन विहिर या घटकाकरीता अनुदान मर्यादा रु. २.५० लक्ष वरुन रु.४.०० लक्ष इतकी करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही,

(३) व ४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत ४५ टक्के निधी केवळ विहिरी खोदण्यात आल्याबाबत

(१६) ५७०८ (२५-०४-२०२५). श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रोजगार हमी योजनेतील सार्वजनिक व वैयक्तिक लाभाच्या योजनांमध्ये संतुलन न ठेवता शासनाने सन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या आर्थिक वर्षांमध्ये या योजनेतील चार हजार कोटींपैकी ४५ टक्के निधी केवळ विहिरी खोदण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दरवर्षी बारा ते पंधरा हजार विहिरी खोदल्या असून त्यावर दीडशे-दोनशे कोटी रुपये खर्च केले व या कालावधीत एक लाखाहून अधिक विहिरींना मंजूरी देऊन १८०० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकारामुळे केंद्र शासनाने राज्याचा उक्त योजनेचा निधी थाबविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण खर्च ४१८४.५६ कोटी झालेला असून त्यापैकी सिंचन विहीर वरील खर्च ९९५.८४ कोटी २४% टक्के निधी केवळ विहीरींवर खर्च करण्यात आला आहे.

आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये एकूण खर्च ४९६७.६२ कोटी झालेला असून त्यापैकी सिंचन विहीर वरील खर्च १६४१.०८ कोटी ३३% टक्के निधी केवळ विहीरींवर खर्च करण्यात आला आहे.

(२) हे खरे आहे.

आर्थिक वर्ष २०२३-२४ व २०२४.२५ सिंचन विहिरीच्या कामांवर एकू २६३६.९० कोटी खर्च झालेला असून खर्च निहाय सरसरी २९% इतकी आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्याच्या विविध जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात भुमाफीयांनी जमिनी खरेदी केल्याबाबत

(१७) ५८२७ (२३-०४-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विविध जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात भुमाफीयांनी जमिनी खरेदी केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोकण किनारपट्टीतील शेतक-यांच्या जमिनीवर मादक द्रव्यासारखे अनैतिक व्यवसाय सुरू करणारे अनेक परप्रांतीय उक्त जमिन जास्त किंमत देऊन खरेदी करत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार अनैतिक व्यवसाय करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

राज्यात विविध जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात भुमाफीयांनी जमिनी खरेदी केल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले नाही.

(२) हे खरे नाही.

अशी कोणतीही बाब निदर्शनास आली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीरामपूर व राजुर (जि.अहिल्यानगर) येथील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृहांच्या समस्यांबाबत

(१८) ६०२७ (२७-०४-२०२५). श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर (जि.अहिल्यानगर) येथील शासकीय आदिवासी मुलांचे व मुलींचे वसतीगृहात पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध नसणे, निकृष्ट दर्जाचे जेवण असणे, इमारतीच्या खिडक्या व फरशा तुटलेल्या असणे, अभ्यासासाठी टेबल, खुर्च्या नसणे, संगणक संच नसणे, स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके नसणे इ. समस्या असल्याचे निदर्शनास आले आहे,, हे खरे आहे काय,

(२) तसेच राजुर (ता.अकोले, जि.अहिल्यानगर) वसतीगृहाचे गृहपाल यांनी आवश्यक साहित्याची मागणी करणारे प्रस्ताव एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात सादर करुनही साहित्य उपलब्ध झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (०७-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे वाटेगाव, (ता.वाळवा, जि.सांगली) या ठिकाणी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे भव्य दिव्य स्मारक उभारण्याबाबत

(१९) ६२९६ (२४-०४-२०२५). श्री.सत्यजित देशमुख (शिराळा) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या मौजे वाटेगाव (ता.वाळवा, जि.सांगली) या मूळ गावी भव्य दिव्य स्मारक उभारण्याची स्थानिक तसेच पंचक्रोशीतील साठे प्रेमी नागरिकांकडून तसेच लोकप्रतिनिधींच्या तीव्र भावना असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्मारकास राज्य शासनाकडून अर्थसंकल्पात २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असूनही स्मारकाच्या कामास अद्यापी सुरुवात न झाल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड नाराजी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त स्मारकाचे काम अद्यापी सुरु न होण्याची कारणे काय आहेत, सदरहू स्मारकाचे काम पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे तसेच याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) तसेच, राज्यात सुरु असलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळामार्फत गेल्या पाच वर्षांत समाजातील किती तरुणांना त्याचा प्रत्यक्ष लाभ झाला, तसेच एकूण किती रक्कमेचे वाटप करण्यात आले याबाबतचा तपशिल देण्यात यावा,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उक्त ठिकाणी अण्णाभाऊ साठे यांचे भव्य दिव्य स्मारकाचे काम व इतर सोयीसुविधा उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) स्मारकासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही सुरु आहे. परंतू संबंधीत जागेवर अतिक्रमण असून याबाबत मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, इस्लामपूर येथे दावा दाखल आहे. जमीन प्राप्त झालेनंतर स्मारकाचे काम पूर्ण होण्यास अंदाजित ३ वर्षे कालावधी लागू शकतो.

(४) साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे महामंडळामार्फत गेल्या पाच वर्षात विविध योजनेअंतर्गत (अनुदान योजना, बीजभांडवल योजना, थेट योजना, मदत/सुविधा कर्ज योजना, महिला समृद्धी योजना, शैक्षणिक कर्ज योजना) एकूण ४५६५ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला असून त्यासाठी रू. ३७३६.६९ लक्ष इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(५) स्मारकासाठी शासकीय जमीन उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही सुरु आहे. परंतू संबंधीत जागेवर अतिक्रमण असून याबाबत मे. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, इस्लामपूर येथे दावा दाखल आहे.

बीड जिल्ह्यात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत मंजूर कर्ज प्रकरणे बँकांकडे प्रलंबित असल्याबाबत.

(२०) ७१४८ (२०-०७-२०२५). श्री.धनंजय मुंडे (परळी) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात लोकशाहीर अण्णा भाऊसाठे विकास महामंडळामार्फत सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात मंजूर करण्यात आलेल्या १०० अनुदान योजनांपैकी ७४ प्रकरणे बँकांकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणांवर बँकाकडून वेळेत निर्णय न झाल्यामुळे लाभार्थींना अनुदान व कर्ज वितरणात विलंब होऊन त्यांचे उद्योग व व्यवसाय सुरू करण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रस्ताव दाखल करूनही बँकांकडून वेळेवर मंजुरी न मिळाल्यामुळे शासनाच्या सामाजिक न्याय धोरणांना धक्का बसून उद्दिष्टपूर्तीवर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बँकांकडील प्रलंबित ७४ प्रकरणाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१७-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात लाभार्थी निवड समिती मध्ये अनुदान योजनेंतर्गत पात्र झालेली ३६ प्रकरणे व बीजभांडवल योजनेंतर्गत ७२ प्रकरणे असे एकुण १०८ कर्ज प्रकरणे बॅंकांकडे मंजूरीस प्रलंबित आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) बीड जिल्हा कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी यांनी कर्ज प्रकरणांच्या कार्यवाहीबाबत संबंधीत बॅंकांशी वेळोवेळी संपर्क साधला. बॅंकांकडून सदर कर्ज प्रकरणांबाबत अद्यापही मंजूर/नामंजूरी बाबत अधिकृत माहिती मिळालेली नाही.

संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी बँकांना दिलेल्या भेटीत बँकाकडून खालीलप्रमाणे कर्ज प्रकरणे प्रलंबित राहण्याची कारणे देण्यात आलेली आहेत.

१) लाभार्थींचे सिबिल कमी आहे.

२) लाभार्थी व्यवसाय करण्यास सक्षम आहे.

३) लाभार्थीने व्यवसायाचे अनुभव/प्रशिक्षण घेतलेले नाही.

४) लाभार्थीने ज्या ठिकाणी व्यवसाय करावयाचा आहे त्यासंबंधी आवश्यक बाबी नसल्याचे बँक कर्मचारी यांचे स्थळ पाहणीस निदर्शनास आले आहे. (उदा.शेड, गोठा, पाणी, वीज व इतर)

५) संबंधित एकाच प्रकारचे व्यवसाय एकाच ठिकाणी खुप असल्यामुळे व इ.कारणास्तव बँका कर्ज प्रकरणांना मंजुरी नाकारतात व प्रलंबित ठेवतात.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या २२ हजार कर्मचा-यांना म्हाडाच्या माध्यमातुन सदनिका बांधुन देण्याबाबत

(२१) ७४८१ (२०-०७-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या २२ हजार कर्मचा-यांना म्हाडाच्या माध्यमातुन राहण्यासाठी योग्य अशा सदनिका बांधुन देण्याचा निर्णय दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी वा त्या दरम्यान महसूलमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी घेतला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नावरील घेतलेल्या निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मा. संचालक मंडळाच्या दिनांक२४.०४.२०२५ रोजी झालेल्या ३२७ व्या बैठकीमध्ये विषय क्र. ३२७/१७ अन्वये शेती महामंडळाच्या १४ शेत मळयांवरील वापरण्यास योग्य नसणारी व ५० वर्षे जुनी असणारी व स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये राहण्यासाठी अयोग्य ठरवण्यात आलेली निवासस्थाने नैसर्गिक आपत्ती परिस्थितीत पडून जिवीत हानी व वित्त हानी टाळणेच्या दृष्टीने तात्काळ रिक्त करणेकामी स्थावर व्यवस्थाकांमार्फत योग्य ती कार्यवाही करणेबाबत ठराव मंजूर करण्यात आला आहे.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात मत्स्यव्यवसायाला कृषी क्षेत्रासारखाच दर्जा दिला असल्याबाबत

(२२) ७५४४ (२०-०७-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मत्स्यव्यवसायाला कृषी दर्जा दिला असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना दिला जाणारा शेतकरी दाखला हा मच्छिमार बांधवांना देखील देण्यात यावा आणि मच्छिमारांना देखील शेतकऱ्याप्रमाणे शेत जमीन खरेदी-विक्रीचे अधिकार देण्यात यावेत, अशी मागणी मा. मुख्यमंत्री, महसूल मंत्री व कृषीमंत्री महोदयांकडे अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीने दिनांक ५ मे, २०२५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे , हे ही खरे आहे काय;
(३)असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने राज्यातील मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणे शेतीचा दाखला आणि शेत जमीन खरेदी-विक्रीचे अधिकार देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नितेश राणे (०३-१०-२०२५) : (१) होय
(२) होय
(३) दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मत्स्यव्यवसायास क्षेत्रास (प्रक्रिया उद्योग वगळता) कृषी समकक्ष दर्जा देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

यानुसार मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणे वीज दरात सवलत, बँकांकडून कर्ज दरात सवलत, इत्यादी आणि अल्प दराने विमा संरक्षणाचा लाभ तसेच सौर उर्जेबाबत उर्जा विभागाद्वारे देण्यात येणारे लाभ अंतर्भूत करण्यात आले आहे.

राज्यातील मच्छिमारांना शेतकऱ्यांप्रमाणे शेतकरी दाखला आणि शेत जमीन खरेदी-विक्रीचे अधिकार देणे ही बाब मत्स्यव्यवसाय विभागाच्या अखत्यारीतील नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात वनविभागातील उप वनविभागांना स्वतंत्र दर्जा देण्याबाबत

(२३) ७७७८ (२१-०७-२०२५). श्री.अमोल खताळ (संगमनेर) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागातील दिनांक २५ मे, २०२३ रोजी काढलेला शासन निर्णय तातडीने रद्द करुन उप वनविभागांना स्वतंत्र दर्जा देऊन त्यावर विभागीय वनाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची पद:स्थापना करण्याची मागणी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री तसेच मा.मंत्री (वने) महोदयांकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अकोले व संगमनेर या तालुक्यात वनक्षेत्र मोठ्या प्रमाणात असून वनविभागाचे संरक्षण व संवर्धन होण्यासाठी वनक्षेत्रास स्वतंत्र वन विभागाचा दर्जा दिल्यास वनसंवर्धनात मोठा फायदा होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील वनक्षेत्र सुमारे १८० कि.मी. अंतरावर असून दोन तालुक्यातील वनक्षेत्राला स्वतंत्र वनविभागाचा दर्जा दिल्यास विभागाचे विभागीय वन अधिकारी यांना मानव वन्यजीव संघर्ष कार्यक्षमरित्या हाताळणे शक्य होईल तसेच शेतपीक व इतर नुकसानीच्या प्रकरणाच्या कालमर्यादेत काम करता येईल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात वनविभागातील उप वनविभागांना स्वतंत्र वन विभागाचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (२८-१०-२०२५) : (१) होय.

(२) व (३) महसुल व वन विभागाच्या दिनांक२५.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये वनविभागातील स्वतंत्र मालेगाव, संगमनेर, परभणी व भोर या उपवनविभागाचे संबधित वनविभागात समायोजन करण्यात आले आहे. उपरोक्त उपवनविभाग संबधित उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहेत. सदर उपवनविभागात कामकाजासाठी पूर्वीप्रमाणेच सहाय्यक वनसंरक्षक (कनिष्ठ श्रेणी) संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती कायम ठेवण्यात आली आहे.

सहाय्यक वनसंरक्षक (कनिष्ठ श्रेणी) अधिकाऱ्याकडून वनक्षेत्राचे संरक्षण, संवर्धन व मानव वन्यजीव संघर्ष हे विषय कार्यक्षमरीत्या हाताळण्यात येत आहे. सहाय्यक वनसंरक्षक (कनिष्ठ श्रेणी) व वनक्षेत्रपाल यांच्याकडून शेतपीक व इतर नुकसानीची प्रकरणी कालमर्यादेमध्ये निकाली काढण्यात येत आहेत.

(४) व (५) प्रश्न उपस्थित होत नाही.

पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी गावांना अनुसूची ५ व ६ अंतर्गत पेसामध्ये समाविष्ट करण्याबाबत

(२४) ८१२५ (०८-०९-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपूर) तालुका हा आदिवासी बहुल तालुका असून ७५ टक्के लोकसंख्या अनुसूचित जमातीची असल्याने या तालुक्यातील आदिवासी गावांमध्ये मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर गावांमधील गावकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याकरिता आदिवासी गावांना अनुसूची ५ व ६ अंतर्गत पेसामध्ये समाविष्ट करण्यात यावे, या मागणीचे लेखी निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांना दिनांक १२ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी गावांना अनुसूची ५ व ६ अंतर्गत पेसामध्ये समाविष्ट करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (१४-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
सन २०११ च्या जनगणनेनुसार पोंभुर्णा (जिल्हा चंद्रपूर) तालुक्यातील एकूण लोकसंख्या ५०७८१ आहे. त्यापैकी आदिवासी लोकसंख्या १३५४१ इतकी असून आदिवासी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण २६.६७ टक्के आहे. पोंभूर्णा तालुक्यातील आदिवासी गावांमध्ये विविध योजनांमधून मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.
(२) हे खरे आहे.
(३) अनुसूचीत क्षेत्रामध्ये गावे समाविष्ट करण्यासाठी केंद्र शासनाद्वारा निकष विहित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार सन २०११ च्या जनगणनेवर आधारित राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव केंद्र शासनास दिनांक ११.१०.२०२४ रोजी सादर करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी प्रशिक्षणार्थ्यांचा कालावधी वाढवून मिळण्याबाबत

(२५) ८१३७ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी प्रशिक्षण संस्था पुणे (टी.आर.टी.आय.) अंतर्गत सक्षम भारतीय प्रशासकीय सेवा (प्रशिक्षण केंद्र) येथे २५० विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण कालावधी संपुष्टात येत असल्याने या योजनेची मुदत तीन महिने विद्यावेतन (स्टायपेंड) सोबत वाढवून द्यावी, अशी मागणी प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांनी मा.सहपालकमंत्री यांना माहे मे, २०२५ मध्ये निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, या प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या साधनसामग्री (किट) चे ५० हजार रुपये आदिवासी प्रशिक्षण संस्थेने अद्यापपर्यंत बँक खात्यावर जमा केले नसल्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांना प्रतिक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ. अशोक उईके (२६-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
पोलीस व सैन्य भरती परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठीच्या साधनसामग्री (कीट) करीता किंमत रुपये ५० हजार नसून ते रुपये ५ हजार आहे व ते प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतनासोबत थेट लाभ हस्तांतरण व्दारे अदा करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मोक्याच्या जमिनीवर दलालांचे सावट आल्यामुळे जमिन मालक भूमीहीन होणार असल्याबाबत

(२६) ८२२६ (१९-०८-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक जमिनी कवडीमोल भावाने विकण्याचे प्रकार दोन्ही जिल्ह्यात सुरु असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेकडो एकर जमिनीची खरेदी विक्री सुरु असल्याने जिल्ह्यातील अनेक जणांना भूमीहीन होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्हयातील मोक्याच्या जमिनीवर दलालांचे सावट आल्यामुळे जमिन मालक भूमीहीन होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०९-२०२५) : (१), (२), (३) व (४)

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात अशा प्रकारची बाब निदर्शनास आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे बंद करण्यात आल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ आल्याबाबत

(२७) ९२६४ (०८-०९-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.रामदास मसराम (आरमोरी) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामरागड (जि.गडचिरोली) तालुक्यात रोजगार हमी योजनेची कामे बंद करण्यात आल्याने मजुरांवर उपासमारीची वेळ आल्याने या योजनेची कामे तातडीने सुरु करण्याची मागणी ग्रामस्थांकडून शासनाकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षात प्रलंबित असलेली मजुरी लाभार्थ्यांना अद्यापही मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन आदिवासी गावात रोजगार हमी योजनेची बंद झालेली कामे सुरु करण्याबाबत तसेच रोजगाराची कामे नसल्यास मंजुरांना बेकार भत्ता सक्तीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' शासनाने अकार्यक्षमपणे राबाविल्याबाबत

(२८) ९३९७ (२१-०७-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' ही निवडणुकीपूर्वी जाहीर करण्यात आली असून, तिच्यासाठी ३० कोटी रुपये मंजूर करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्यक्षात फक्त एक तीर्थयात्रा आयोजित करण्यात आली असून उर्वरीत निधी खर्चाच्या प्रतीक्षेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, "मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना" अंतर्गत अयोध्येतील राममंदिर दर्शनासाठी नियोजित १३ तीर्थयात्रा पूर्ण करण्यासाठी आवश्यक रु. २५ कोटींचा निधी हप्ता वितरित करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक सूचना आणि जाहिरात करण्यात आली नाही, की ज्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना उक्त योजनेबद्दल सखोल माहिती मिळेल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, शासनाने 'मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना' सुरू करून राजकीय लाभ घेतला असला, तरी प्रत्यक्षात लाभार्थ्यांची निवड, प्रवास व्यवस्था व सुरक्षा यासंदर्भात कोणतीही ठोस अंमलबजावणी राबविण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१४-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) नाही, हे खरे नाही.
(३) नाही, हे खरे नाही.
(४) नाही, हे खरे नाही.
(५) नाही, हे खरे नाही.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या मजुरीत वाढ करण्याबाबत

(२९) ९४१६ (०८-०९-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील रोजगार हमी योजनेचे मजूर भर उन्हात काम करीत असूनही त्यांच्या मजुरीत दिवसाला केवळ १५ रुपयांची माहे एप्रिल, २०२५ मध्ये वाढ केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या तुटपुंज्या वाढीमुळे रोजगार हमी योजनेच्या मजुरांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत सदर मजुरीत वाढ करण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात रोजगार हमी योजनेतील मजुरांच्या मजुरीत वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हो, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४)
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र पुरस्कृत योजना आहे. अकुशल मजुरीचे दर केंद्र शासनाकडून दरवर्षी निश्चित केले जातात. २०२५-२६ करीता केंद्र शासनाने प्रतिदिन रू.३१२/-इतका मजूरीचा दर निश्चित केला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

यवतमाळ जिल्ह्यातील महसूल विभागात सुधारित आकृतिबंध लागू करण्याबाबत

(३०) ९७१३ (२०-०७-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील महसूल विभागात १७ वर्ष जुन्या आकृतिबंधानुसार कार्यरत मनुष्यबळावरच कामकाज सुरु असून त्यातही महसूल विभागातील विविध संवर्गातील मंजूर पदापैकी ६७ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने महसूल विभागाचा सुधारित आकृतिबंध तयार करण्यासाठी ५ वर्षापूर्वी समिती स्थापन केली असून सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सुधारित आकृतिबंध लागू करण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१०-२०२५) :

(१) होय, हे अंशत: खरे आहे.

महसूल विभागाच्या आकृतिबंधानुसार यवतमाळ जिल्ह्यामध्ये महसूल विभागाच्या विविध संवर्गाकरीता एकूण १५५८ पदे मंजूर आहेत. त्यापैकी १४७३ पदे कार्यरत असून १८५ पदे रिक्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महसूल विभागाच्या सुधारित आकृतिबंधाच्या अनुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दांस अनुसरून पुनश्च: प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

पारनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्याच्या तहसिलदार यांच्या बेकायदेशीर कामाची चौकशी करण्याबाबत

(३१) १०२७९ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहिल्यानगर) तालुक्याचे तहसिलदार श्रीमती ज्योती देवरे यांच्या बेकायदेशीर कामाची चौकशी शासनाकडून सुरू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) तसेच त्यांनी जे खेड तहसिलदार म्हणून वादग्रस्त निर्णय दिले याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१६-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) श्रीमती. ज्योती देवरे, तत्का.तहसिलदार, पारनेर, जि.अहिल्यानगर या पदावर कार्यरत असताना अनाधिकाराने बिनशेती आदेश पारित करणे, अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीमध्ये नियंत्रण न ठेवले प्रकरणी यांचेविरुध्द

(३) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ अन्वये शासन ज्ञापन क्र.विभाचौ २६४१/ प्र.क्र.२४८/ई-४अ, दिनांक०४.०७.२०२५ अन्वये सुरु करण्यात आलेली आहे.

श्रीम.देवरे या तहसिलदार खेड या पदावर कार्यरत असताना त्यांचे तहसिलदार पदावरील कामकाजाच्या अनुषंगाने शासन स्तरावर त्यांचेविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) येथील गट नंबर ३५७ ह्या शासकीय जमिनीबाबत

(३२) १०३४७ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खराबवाडी (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायत येथील गट नंबर ३५७ ही शासकीय जागा असून भूमीहीन शेत मजूर, अनुसूचित जाती व जमातीसह पवना धरण बाधित शेतकऱ्यांना सदर जमिनीचे वाटप केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासकीय जागा सार्वजनिक बांधकाम विभाग, दगड खाण चाकण नगरपरिषद यांना घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी जिल्हाधिकारी तत्कालीन पालकमंत्री यांनी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चाकण नगरपरिषद घनकचरा जागेवर सन २०१९ मध्ये वन विभागाने मालकी दाखविल्याने यावर चाकण नगरपरिषदेमार्फत मा.उच्च न्यायालयात वन विभागाविरुद्ध याचिका दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एका खाजगी कंपनीने दस्त क्रमांकानुसार सदर जागा खरेदी करून चाकण नगरपरिषद घनकचरा यांच्या नावे दर्शविण्यात आल्याने महसूल, नगरविकास आणि वन विभाग यांची भूमिका काय आहे,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-११-२०२५) :

मुद्दा क्र. (१) व (२) हे खरे आहे.मौजे खराबवाडी ना खेड जि पुणे येथील जमीन गट न ३५७ (जुना गट क्र २८९१ वाडी विभाजनापूर्वीचा) जुना सर्व्हे नं ६४६ एकूण क्षेत्र १७१ हे १९ आर ही जमीन पुर्वी रिझर्व फॉरेस्टची होती. मामलेदार खेड यांचे दि ०९/०६/१९६७ रोजीचे आदेशान्वये फॉरेस्ट खात्यातर्फे मुलकी खात्याकडे वर्ग करुन व ताबा देऊन सरकारी मुलकी फॉरेस्ट असे नाव ७/१२ पत्रकी दाखल केल्याचे फेरफार नोंद क्र १४०३१ दिनांक ०१/०७/१९६७ अन्वये दिसून येते.प्रस्तुत जमिनीमधील १७१.१९ हे. आर. क्षेत्र पवना प्रकल्पग्रस्त व्यक्ती यांना फेरफार क्र. १४३४ दिनांक ०६/०१/१९८२ व फेरफार क्र. ५९० दिनांक ३१/०७/१९७८ अन्वये पवना धरण विस्थापितांना वाटप केले होते.तसेच फेरफार क्र. ८९९ दिनांक २५/०४/१९७६ अन्वये भूमीहीन लोकांना क्षेत्र वाटप करणेत आलेले आहे.

(३)हे खरे आहे.चाकण नगरपरिषदेद्वारे सन २०१९, मध्ये वनविभागाविरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन याचिका नं. WP/७४६४/२०१९ दाखल केली आहे.

(४) होय, हे खरे आहे.मुख्याधिकारी, चाकण नगरपरिषद चाकण यांचेकडील अहवालानुसार चाकण नगरपरिषदेने सन २०१९ मध्ये वनविभागाविरुध्द मा उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन याचिका नं WP/७४६४/२०१९ दाखल करण्यात आल्याचे कळविले आहे.

मुद्दा क्र.(५) व (६) चाकण नगरपरिषदेद्वारे गट नं.३५७ येथील घनकचरा संकलन केंद्रावर जाणारा पोहच रस्ता हा खासगी जमीन मालक श्री. शिवकुमार नलगे यांच्या खासगी जमिनीमधून जात असल्यामूळे त्यांनी सदर रस्ता दिनांक १५/०५/२०२५ रोजी लोखंडी पत्र्याचे कुंपन तयार करुन अडविला होता. तद्नंतर उपविभागीय अधिकारी खेड यांचेकडील दिनांक २०/०५/२०२५ रोजीच्या पत्रान्वये भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १५२ नुसार पोलीस उपायुक्त परिमंडळ-३ ,पिंपरी चिंचवड जि. पुणे यांना पत्र दिल्यानंतर संबधित खाजगी मालक श्री. नेलगे यांनी सदर रस्ता स्वत:हून खुला करुन दिला आहे.

गेवराई (जि.बीड) येथील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ यांच्याकडून झालेल्या अनियमिततेबाबत

(३३) १०७२९ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) कार्यालयामधील श्री.संजय गोपवाड, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ हे बऱ्याच कालावधीपासून कार्यरत असून त्यांच्याविषयी अनेक तक्रारी प्राप्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापुर्वी देखील अशाच अनियमिततेच्या व गैरव्यवहाराच्या बाबतीत वेळोवेळी विभागाकडे पत्र व्यवहार

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या विषयी १) श्री.गोपवाड यांचे मुळ पद व कार्यालयीन कामकाज केलेले ठिकाण व कार्यकाळ, त्याकाळात बजावलेली सेवा व पद, २) दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी गेवराई येथे कार्यरत असतांना त्या काळात गुंठेवारीच्या आधारे नोंदवलेले सर्व दस्त व ३) वारंवार यांच्याविषयी स्थानिक दैनिकामध्ये अनेक गैरव्यवहाराच्या बातम्या प्रसारित झालेल्या आहेत तसेच लोकप्रतिनिधी यांच्या तक्रारीची दखल घेत आपणाकडून त्यांची चौकशी अथवा खाते अंतर्गत चौकशी करण्यात आलेली आहे किंवा नाही याबाबतच्या अहवालाच्या माहितीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मे, २०२५ रोजी मंत्री महसूल विभाग, अपर मुख्य सचिव नोंदणी व मुद्रांक शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई, विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर व नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-१०-२०२५) :

(१) व (२) हे अंशत: खरे आहे.

श्री.गोपवाड हे दिनांक १७.१०.२०२२ पासून दुय्यम निबंधक, गेवराई या कार्यालयात कार्यरत आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दुय्यम निबंधक, गेवराई यांचे संदर्भात दिनांक १७.०५.२०२५ रोजी तक्रार केलेली आहे.

(३) हे खरे नाही.

स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दिनांक १७.०५.२०२५ रोजीच्या तक्रारीची दखल घेत सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ बीड कार्यालयाच्या दिनांक २६.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सह दुय्यम निबंधक गेवराई कार्यालयाची तपासणी करणेकरिता तपासणी पथक गठीत करण्यात आले होते. सदर तपासणी पथकाने दिनांक १५.०९.२०२५ रोजी सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ बीड कार्यालयास तपासणी अहवाल सादर केला आहे. तद्नुषंगाने सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ बीड कार्यालयाने सह दुय्यम निबंधक गेवराई यांना दिनांक १६.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये वसूलीची कार्यवाही करणेबाबत आदेशित केले आहे.

४) हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या अनुषंगाने सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ बीड कार्यालयाकडून दिनांक २१.०५.२०२५ व दुय्यम निबंधक गेवराई कार्यालयाकडून दिनांक ०५.०६.२०२५ व दिनांक २०.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये लोकप्रतिनिधी यांना माहिती उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

दुय्यम निबंधक गेवराई यांचेकडून दिनांक१२.०१.२०२२ रोजी गेवराई कार्यालयात बोगस गुंठेवारीच्या आधारे नोंदवलेले ३२ दस्त व दिनांक ०१.०४.२०२२ ते ३१.१०.२०२२ या कालावधीत नोंदणी झालेल्या दस्तांच्या प्रती व सुची क्र.२ च्या छायांकित प्रती लोकप्रतिनिधी यांना सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ बीड कार्यालयाने दिनांक २१.०५.२०२५ रोजी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या एकूण ३२ दस्तऐवजांच्या अनुषंगाने दुय्यम निबंधक कार्यालय, गेवराई यांनी दिनांक १४.०१.२०२३ रोजी पोलीस स्टेशन गेवराई येथे गुन्हा क्र.००२४/२०२३ दाखल केलेला आहे.सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून त्याचा दावा क्र.RCS No. ४२९/२०२३ असा आहे.

लोकप्रतिनिधी यांचेकडून दिनांक१७.०५.२०२५ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या गैरव्यवहाराबाबत कोणतीही बातमी प्रसिध्द झालेचे आढळून आले नाही.

५) श्री.गोपवाड यांना नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक १०.१०.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे.

पोखरी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील महालक्ष्मी स्टोन क्रशरने केलेल्या अवैध उत्खननाबाबत

(३४) १०७९६ (२०-०७-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोखरी (ता. अंबाजोगाई, जि. बीड) येथील महालक्ष्मी खडी केंद्राने पोखरी शिवारात गट.नं. १५७ मध्ये १०९२७.२५ ब्रास गौण खनिजाचे अवैध उत्खनन केले असल्याने सदर खडी केंद्राला तहसीलदार, अंबाजोगाई यांनी ८९३५१२४९ /- रुपयांचा दंड आकारला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त खडी केंद्राने क्रशरसाठी/उत्खननासाठी सक्षम अधिकारी यांची परवानगी घेतली नसल्याचे आक्षेप नोंदवत प्रस्ताव कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी खडी केंद्र चालकावर कार्यवाही करून ठोठावलेला दंड त्यांच्याकडून त्वरित वसूल करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधितावंर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२७-१०-२०२५) : (१), (२) व (३) होय हे खरे आहे.

(४) तहसिलदार, अंबाजोगाई यांनी सुचना दिल्यानुसार सदर ठिकाणाची १) अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई २) उपअधिक्षक, भूमि अभिलेख, अंबाजोगाई ३) मंडळ अधिकारी, बर्दापूर व ग्राम महसूल अधिकारी, सज्जा भारज यांनी दिनांक १६.१२.२०२४ रोजी सयुक्त ETS मोजणी केली. उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अंबाजोगाई यांना ETS मोजणी मध्ये १०९२७.२५ ब्रास परिमाणाचे अवैध उत्खनन झालेले असल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने तहसिलदार, अंबाजोगाई यांचेकडून यांनी दिनांक १८.०२.२०२५ अन्वये संबंधितास रू.०८,९३,५१,२४९.०७/- एवढ्या रकमेची दंडात्मक नोटीस बजाविण्यात आली आहे. संबंधीताना दंडाची रक्कम शासनखाती जमा केलेली नसल्याने तहसिलदार, अंबाजोगाई यांनी दिनांक २५.०९.२०२५ अन्वये मंडळ अधिकारी बर्दापूर व ग्राम महसूल अधिकारी, सजा भारज यांना संबंधितांच्या मालकीचे मौजे पोखरी येथील ७/१२ वर अवैध गौणखनिज उत्खनन/वाहतूक बाबत होणारी दंडाची रक्कम रू ८,९३,५१,२४९/- थकबाकी या बोजाची नोंद घेण्यास कळविण्यात आले असुन, त्यानुसार संबंधिताचे ७/१२ वर अवैध गौण खनिज उत्खनन बाबत बोजाची नोंद घेण्याची कार्यवाही तहसिलदार, अंबाजोगाई यांच्याकडून सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

बीड महसूल विभागांतर्गत वेगवेगळ्या विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या बदल्याबाबत

(३५) १०८९४ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड महसूल विभागांतर्गत वेगवेगळ्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या सदरील कार्यालयाकडून होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कार्यालयाकडून प्रशासकीय बदलीची यादी प्रसिद्ध न झाल्यामुळे कर्मचारी संवर्गामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाल्यामुळे रिक्त जागा व इतर अनुषंगिक बाबी रितसर समजू शकल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही कर्मचारी सातत्याने एकाच विभागामध्ये मागील १० ते १२ वर्षापासून (प्रतिनियुक्तीने) कार्यरत असून कर्मचाऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक हितसंबंध प्रस्थापित होत असून त्याचा प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावर्षी झालेल्या प्रशासकीय आणि विनंती बदल्यामध्ये सातत्याने एकाच विभागांमध्ये कार्यरत

असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन नियमानुसार कार्यवाही करावी याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २६ मे, २०१९ रोजी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रशासकीय व विनंती बदल्यामध्ये होत असलेल्या अनियमिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) होय. स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक२२.०२.२०२५ व दिनांक१६.०६.२०२५ रोजी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व शासनास पत्र देऊन शासकीय कर्मचारी यांच्या बदली अथवा प्रतिनियुक्तीबाबत नियमोचित कार्यवाही करणेबाबत कळविले होते.

(५) प्रशासकीय बदल्या ह्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाकडून करण्यात आलेल्या आहेत. तसेच विनंती बदल्यांबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर करण्यात आला होता. ज्यामध्ये विभागीय आयुक्त कार्यालयाकडून विनंती बदली प्रस्तावास मान्यता दिलेल्या कर्मचाऱ्यांना पदस्थापना देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

अक्कलकुवा व धडगाव (जि. नंदुरबार) तालुक्यातील तलाठ्यांना व मंडळ अधिकारी यांना सज्जा कार्यालय व निवासस्थाने देण्याबाबत.

(३६) १०९१३ (२०-०७-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकुवा व धडगाव (जि. नंदुरबार) तालुक्यातील तलाठयांना कामकाज करण्यासाठी स्वतंत्र सज्जा कार्यालय नाहीत तसेच त्यांना राहण्यासाठी निवासस्थाने देखील दिलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) तसेच मंडळ अधिकारी यांना देखील कार्यालय व राहण्यासाठी निवासस्थाने दिलेली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तलाठी व मंडळ अधिकारी हे मुख्यालयी रहात नसून ते इतर ठिकाणाहून ये-जा करतात त्यामुळे जनतेला त्रास सहन करावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त तालुक्यात सज्जा कार्यालय व निवासस्थाने बांधणे व कर्मचारी मुख्यालयी थांबण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१५-१०-२०२५) :

(१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

अक्कलकुवा व धडगाव (अक्राणी) (जि. नंदुरबार) तालुक्यात एकूण अनुक्रमे ३४ व १७ अशी एकूण ५१ तलाठी कार्यालये आहेत. अक्कलकुवा येथील ३४ तलाठी कार्यालये खाजगी इमारतीमध्ये कार्यरत आहेत. तसेच, धडगाव (अक्राणी) तालुक्यातील १७ तलाठी कार्यालयांपैकी ०१ तलाठी कार्यालय महसूल विभागाच्या इमारतीमध्ये असून उर्वरीत १६ तलाठी कार्यालये इतर शासकीय विभागाच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत.

अक्कलकुवा व धडगाव (अक्राणी) (जि. नंदुरबार) तालुक्यात एकूण अनुक्रमे ६ व ४ अशी एकूण १० मंडळ अधिकारी कार्यालये कार्यरत असून धडगाव (अक्राणी) तालुक्यातील ०१ मंडळ अधिकारी कार्यालय महसूल विभागाच्या शासकीय इमारतीमध्ये असून उर्वरीत ०९ मंडळ अधिकारी कार्यालये ही खाजगी इमारतीमध्ये कार्यरत आहेत.

अक्कलकुवा व धडगाव (अक्राणी) (जि. नंदुरबार) तालुक्यातील तलाठ्यांना व मंडळ अधिकारी यांना राहण्यासाठी निवासस्थाने दिलेली नाहीत.

(३) हे खरे नाही.

(४) अक्कलकुवा व धडगाव (अक्राणी) (जि. नंदुरबार) तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांची कार्यालये बांधकाम करण्यासाठीचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरून करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय कर्मचारी यांच्या नियमबाह्य बदली अथवा प्रतिनियुक्तीबाबत.

(३७) ११०३६ (१९-०८-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व विभाग कार्यालयामध्ये काही कर्मचारी सातत्याने एकाच ठिकाणी मागील अनेक वर्षापासून कार्यरत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या प्रचलित नियमानुसार त्यांची बदली इतरत्र होणे गरजेचे आहे, परंतु बदली झाल्यानंतरही सदरील कर्मचारी प्रतिनियुक्तीच्या आधारे पुन:श्च त्याच विभागात कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा प्रकारे होत असलेल्या अनियमिततेची स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी चौकशीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, एकाच कार्यालयामध्ये अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कर्मचारीनिहाय तपशीलवार यादी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी पत्राद्वारे स्थानिक प्रशासनाकडे मागविली आहे, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही माहिती मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त विषयी होत असलेल्या बदल्यांमधील अनियमिततेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२९-१०-२०२५) : (१) व (२) हे खरे नाही.

(३) होय, हे खरे आहे.

(४) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक२२.०२.२०२५ व दिनांक१६.०६.२०२५ रोजी विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर व शासनास पत्र देऊन एकाच कार्यालयामध्ये अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कर्मचारीनिहाय तपशीलवार यादी उपलब्ध करून देणेबाबत कळविले होते. त्यानुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांना जिल्हाधिकारी कार्यालय व अधिनस्त कार्यालयांमध्ये अनेक वर्षापासून कार्यरत असलेल्या कर्मचारी यांची नियतकालिक बदल्या सन २०२५ मध्ये बदल्या करण्यात आलेल्या कर्मचारी यांची यादी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(५) प्रशासकीय बदल्या ह्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ नुसार जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाकडून करण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

खेड (जि.पुणे) तालुक्यातील एकूण ३ दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीबाबत

(३८) १११४८ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) तालुक्यामध्ये शासकीय जागेत चाकणसह दुय्यम निबंधक कार्यालय इमारतीचे बांधकाम याबाबत प्रस्ताव देऊनही काम झाले नाही, हे खरे आहे काय,

(२) तसेच चाकण येथील गट नंबर २४९३ या जागेत कार्यालयासाठी जागेची मागणी प्रलंबित असून याच गट नंबर

२४९३ मध्ये बंद शासकीय बंगला असून तिथे दुय्यम निबंधक, चाकण कार्यालय सुरू केल्यास शासनाचे पैसे बचत होऊ शकतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तालुक्यातील सर्व ३ दुय्यम निबंधक कार्यालयाच्या इमारतीसाठी निधी उपलब्ध होईल काय, तसेच उक्त तालुक्यातील असलेल्या म्हाडा अंतर्गत शासन आरक्षण करून सब-रजिस्ट्रार कार्यालयातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने उपलब्ध करून दिली जातील काय, अशाच प्रकारे अन्य सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी म्हाडा अंतर्गत सदनिका उपलब्ध करून देऊन त्यांच्या विभागाच्या नावे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचा निवासस्थानाचा प्रश्न सोडविण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सह दुय्यम निबंधक कार्यालय व निवासस्थानाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२६-०९-२०२५) : (१) ही बाब खरी नाही, दुय्यम निबंधक खेड क्र. १,२,३ यांच्या कार्यालयाकडून अशा स्वरुपाचा प्रस्ताव देण्यात आलेला नाही.

(२) होय, खरे आहे.

उपरोक्त संदर्भ क्र. ४ अन्वये दुय्यम निबंधक खेड क्र.२ यांच्या कार्यालयाने मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना चाकण येथील गट नं २४५२ मधील जागेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच गट नं २४५२ सह पर्यायी जागा म्हणुन गट नं २४९३ चा देखील विचार होणेबाबत विनंती केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची साईट पोस्टिंग म्हणून ओळखली जाणारी अनेक रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत

(३९) १२१९४ (०८-०९-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या बदल्यासंदर्भातील सन २०१७ च्या शासन निर्णयाला दुर्लक्ष करुन दुय्यम ठिकाणी बदली (साईट पोस्टिंग) म्हणून ओळखली जाणारी अनेक पदे वर्षानुवर्ष रिक्त असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल व वन विभागाने दिनांक २२ मे, २०१७ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार प्रादेशिक वन्यजीव सामाजिक वनीकरण संशोधन व प्रशिक्षण आणि मुल्यांकन या प्रत्येक विभागात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी किमान तीन वर्षे सेवा देण्यासंदर्भात शासनाने कोणती भूमिका घेतली आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची साईट पोस्टिंग म्हणून ओळखली जाणारी अनेक रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गणेश नाईक (२९-१०-२०२५) : (१) ,(२) व (३) हे खरे नाही.

महसूल व वन विभागाच्या दिनांक२२.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये वन विभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल यांच्या बदली बाबत तरतूदी विहित करण्यात आल्या आहेत.त्यानुसार सरळसेवा व पदोन्नतीने नियुक्तीनंतर प्रथम पदस्थापना शक्यतो प्रादेशिक किंवा वन्यजीव शाखेत करण्याची तरतूद आहे. त्यानंतर प्रादेशिक शाखेत ३ वर्षाचा पदावधी पूर्ण केल्यानंतर शक्यतो सामाजिक किंवा वन्यजीव किंवा इतर शाखेत

तसेच सामाजिक वनीकरण शाखेत ३ वर्षाचा पदावधी पूर्ण केलेल्या अधिका-यांना प्रादेशिक किंवा वन्यजीव किंवा इतर शाखेत व वन्यजीव शाखेत ३ वर्षाचा पदावधी पूर्ण केल्यानंतर प्रादेशिक किंवा सामाजिक किंवा इतर शाखेत बदली देण्याबाबत तरतूद आहे.

त्याअनुषंगाने वनविभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल संवर्गातील अधिकाऱ्यांच्या पदाच्या उपलब्धतेनुसार बदल्या करण्यात येतात. शक्यतो प्रादेशिक, वन्यजीव, सामाजिक वनिकरण तसेच, इतर सर्व शाखातील पदे भरण्याची कार्यवाही पद उपलब्धतेनुसार करण्यात येते. वन विभागातील कार्यकारी पदासोबत अकार्यकारी पदे सुध्दा भरण्यात येतात. वन विभागातील सहाय्यक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल संवर्गातील मंजूर, भरलेली व रिक्त पदे यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे .

अ.क्र संवर्ग मंजूर पदे कार्यरत पदे रिक्त पदे

१ सहाय्यक वनसंरक्षक (कनिष्ठ श्रेणी) २८९

२६३

२६

२ वनपरीक्षेत्र अधिकारी ९९९

७७६

२१५

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील भटक्या विमुक्त समाजाच्या विविध मागण्या संदर्भात

(४०) १२२०४ (१९-०८-२०२५). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भटक्या विमुक्त समाजाच्या विविध मागण्यासंदर्भात मा.महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समाजाला जात प्रमाणपत्र, आधार कार्ड, रेशनिंग कार्ड सह विविध दाखले देण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर आयोजित करावे तसेच या समाजाला राज्यात कुठेही रेशनिंग दुकानातून धान्य उपलब्ध होईल अशा प्रकारच्या १५ मागण्याबाबतचे निर्णय महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (३०-०९-२०२५) : (१) होय,भटके विमुक्तांसाठी सर्वंकष कागदपत्र अभियान व इतर महत्वाच्या विषयाबाबत दिनांक १५.५.२०२५ रोजी मा.मंत्री (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती.

(२) व (३) सदर बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासन परिपत्रक दिनांक ३.६.२०२५ अन्वये इतिवृत्त निर्गमित करण्यात आले असून संबंधित विभागांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील ग्रामदान अधिनियम १९६४ चा कायदा रद्द/सुधारणा करणेबाबत

(४१) १२४१५ (१९-०८-२०२५). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम १९६४ च्या कायद्याखाली जमीनींच्या संदर्भात शासनाची भुमीका ठरविण्यासाठी प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय क्र. जमीन – २०१६/प्र.क्र. १००/ज-१ दिनांक २३ मार्च, २०१६ अन्वये अभ्यास समिती गठीत केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासन निर्णय दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये शासनाची भुमीका ठरविण्यासाठी अभ्यास समितीअंतर्गत विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली उपसमिती गठीत करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अभ्यास समिती व उपसमितीकडून शासनास शिफारसी सादर करण्यात आल्या आहेत काय,

(४) असल्यास, उक्त सादर करण्यात आलेल्या शिफारसींचे स्वरूप काय आहे याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१०-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

राज्यातील "महाराष्ट्र ग्रामदान अधिनियम, १९६४" आणि "मध्य प्रदेश भूदान यज्ञ अधिनियम, १९५३" अधिनियमांतर्गत जमिनींच्या संदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकरीता याबाबत सर्वंकष अभ्यास करुन शासनास योग्य शिफारसी करण्याकरीता शासन निर्णय क्र.जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१, दिनांक २३ मार्च, २०१६ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

सदर समितीस सहाय्य करण्याकरीता दिनांक ३०.०५.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) व (४) विभागीय आयुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या उप समितीने दिनांक २४.०२.२०२३ रोजी शासनास अहवाल सादर केला आहे. तथापि, सदर अहवाल हा मध्य प्रदेश भूदान यज्ञ अधिनियम-१९५३ अंतर्गत येणाऱ्या विदर्भ क्षेत्रासाठीच मर्यादित असल्याचे दिसून आले आहे.

त्यामुळे, विदर्भ क्षेत्र वगळता राज्याच्या उर्वरित विभाग- कोकण, पुणे, नाशिक व छत्रपती संभाजी नगर या क्षेत्रासाठी लागू असलेल्या तरतुदींचा अभ्यास करुन प्रधान सचिव/अ.मु.स.यांच्या अध्यक्षतेखालील नेमलेल्या समितीस अहवाल सादर करण्यासाठी शासन पत्र दिनांक ११.१२.२०२४ अन्वये विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली उप समिती गठीत करण्यात आली असून सदर उप समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर पूढील कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) धोरणात्मक बाब आहे.

राज्यात रेडीरेकनर दरात वाढ केल्याबाबत.

(४२) १२५०३ (२०-०७-२०२५). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रेडीरेकनर दरात सरासरी ४.३९ टक्यांनी वाढ केल्याने नोंदणी आणि मुद्रांक शुल्कवाढ होणार असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेडीरेकनर दरात वाढ केल्याने सर्वसामान्यांच्या घरांच्या किंमतीत वाढ होऊन याचा परिणाम मध्यमवर्गीयांवर होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१४-१०-२०२५) : (१) हे खरे आहे.

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमुल्य निश्चिती) नियम, १९९५ मधील तरतुदींनुसार प्रत्येक वर्षी वार्षिक मूल्यदर तक्ते सुधारित करणेची कार्यवाही पार पाडली जाते. सन २०२२-२३ नंतर तीन वर्षानंतर म्हणजेच सन २०२५-२६ मध्ये वार्षिक मूल्यदर तक्ते सुधारित करणेत आलेली आहे. सन २०२५-२६ या वर्षाकरिता राज्यात रेडीरेकनर दरात सरासरी वाढ ४.३९% (मुंबई वगळता) व मुंबईसह ३.८९% वाढ झाली आहे.

(२) हे खरे नाही.

संपुर्ण राज्याचे सलग तीन वर्ष वार्षिक मुल्यदर तक्यातील दर हे स्थिर ठेवल्यामुळे सदरची वाढ ही तीन वर्षाची आहे व ती प्रत्यक्ष बाजारात असलेल्या प्रचलित दरापेक्षा कमी आहे. बाजारभावाप्रमाणे मुद्रांक शुल्क आकारणी करणे ही अधिनियमातील तरतुद आहे. त्याअनुषंगाने वार्षिक मुल्यदर तक्ते सुधारित करणे आवश्यक ठरते. त्याकरिता केलेली वाढ ही मागील तीन वर्षातील प्रत्यक्ष झालेल्या दस्त नोंदणीच्या आधारे वाढ / घट इ. चा विचार करुन निश्चित करण्यात आली आहे. वार्षिक मुल्यदर तक्ते तयार करताना, मागील वर्षातील दस्त नोंदणीच्या आधारे वाढ / घट ठरविले जात असल्यामुळे वार्षिक मुल्यदर तक्त्यामुळे घरांच्या किंमतीत वाढ अथवा घट होत नाहीत

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात जात पडताळणीची ४० हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

(४३) १२९३५ (१९-०८-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत असून अधिकाऱ्यांची प्रलंबित पदोन्नती व पात्र अधिकाऱ्यांची कमतरता यामुळे ३६ समित्यांचा कार्यभार ४ अध्यक्षांकडे असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४ अध्यक्षांकडे ४० हजार २९७ जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ४ अध्यक्षांकडे ३६ जिल्ह्याचा कारभार असल्याने विद्यमान समित्या कायदेशीर दृष्ट्या सक्षम नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांवर ३० अधिकारी अध्यक्ष म्हणून नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१३-१०-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

राज्यात जिल्हानिहाय ३६ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यान्वीत आहेत. सदर समित्यांवरील अध्यक्षांची ३० पदे ही महसूल व वन विभागामार्फत अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातून भरण्यात येतात. उर्वरीत ६ पदे ही सामाजिक न्याय विभागांतर्गत अतिरिक्त आयुक्त तसेच मंत्रालयीन सह सचिव संवर्गातून भरण्याची तरतूद आहे. माहे डिसेंबर-२०२४ चे कालावधीत सदर समित्यांवरील अध्यक्ष या पदावर कार्यरत असलेल्या १४ अध्यक्षांपैकी १० अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) यांची भारतीय प्रशासन सेवेतील पदावर निवड झाल्याने अध्यक्षांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त झाली होती. त्यामुळे विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी कोणताही मागासवर्गीय विद्यार्थी वंचित राहणार नाही याकरिता अध्यक्ष पद रिक्त असलेल्या पदाचा अतिरिक्त कार्यभार कार्यरत असलेल्या अध्यक्षांकडे सोपविण्यात आलेला होता.

तद्नंतर महसूल व वन विभागाने अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातील २९ अधिकाऱ्यांची दिनांक

२५.०२.२०२५ च्या आदेशान्वये अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर नियुक्ती केली आहे. त्यानुसार २८ अधिकारी अध्यक्ष या पदावर रुजू झाले आहेत.
(२) व (३) हे खरे नाही.
महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विजाभज, इमाव व विमाप्र (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० व त्या अंतर्गत नियम, २०१२ मधील नियम १८(५) नुसार जात वैधता प्रमाणपत्राचा निर्णय ३ महिन्याच्या आत घेणे बंधनकारक आहे आणि अपवादात्मक परिस्थितीत २ महिन्यांचा जास्तीचा कालावधी समितीस घेता येईल, अशी तरतूद आहे. माहे मे, २०२५ अखेर ४५,६२८ प्रकरणे प्रलंबित असून, त्यामधील ३ महिन्यापेक्षा जास्त कालावधीची ३९३४ प्रकरणे प्रलंबित आहेत. याबाबत शासनस्तरावर आढावा घेण्यात आला असून, सर्व समित्यांना विशेष मोहीमा राबवून विहित वेळेत वैधता प्रमाणपत्र देण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.
(४) महसूल व वन विभागाने अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गातील २९ अधिकाऱ्यांची दिनांक २५.०२.२०२५ च्या आदेशान्वये अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीवर नियुक्ती केली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत देवस्थान जमीन धारकांना विहिरीसाठी अनुदान देण्याबाबत

(४४) १२९८४ (२१-०७-२०२५). श्री.गोपिचंद पडळकर (जत) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात रोजगार हमी योजनेंतर्गत ज्या व्यक्तीचा सातबारा उतारा नावासह आहे व त्यांना विहिर काढण्यासाठी अनुदान मिळते, परंतु देवस्थान जमिनीचा सातबारा देवाच्या नावाने असल्याने तेथील पुजारी यांना विहीरीसाठी असलेले अनुदान मिळत नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवस्थान जमीनधारक पुजारी यांना विहीरीसाठी अनुदान देण्याची मागणी देवस्थान संस्था तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेंतर्गत देवस्थान जमीन धारकांना विहिरीसाठी अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२७-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.
दिनांक०४ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये लाभधाराकांची पात्रता निश्चित करण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

वरूड (जि.अमरावती) येथील तहसील कार्यालयात अधिकारी व कर्मचा-यांची पदे रिक्त असल्याबाबत.

(४५) १३१२७ (२१-०७-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरूड (जि.अमरावती) येथील तहसील कार्यालयात अधिकारी व कर्मचा-यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे नागरिकांच्या कामांमध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कार्यालयातील एकूण मंजूर पदांपैकी जवळपास दोन तृतीयांश पदे रिक्त असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तहसिल कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०९-१०-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.

वरुड (जि.अमरावती) येथील तहसील कार्यालयात मंजूर ७८ पदांपैकी गट-ब संवर्गात १ तर गट-क संवर्गात १२ अशी एकूण १३ पदे जुलै, २०२५ अखेर रिक्त आहेत.

(३) व (४) गट-ब व गट-क संवर्गातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

नागपूर येथे रोजगार हमी योजनेंतर्गत विभागीय कार्यालयात विविध पदे रिक्त असल्याबाबत

(४६) १३९१९ (१९-०८-२०२५). श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे रोजगार हमी योजनेंतर्गत विभागीय कार्यालयात कार्यकारी अभियंता (जलसंपदा), शाखा अभियंत्याची तसेच स्टेनोची २, अव्वल कारकून ३, सहआयुक्त, रोजगार हमी उपजिल्हाधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, अधिक्षक कृषी अधिकारी यासह शिपाई व वाहनाचालकांची पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदे रिक्त राहिल्याने त्याचा ग्रामस्थस्तरावरील योजनांच्या अंमलबलावणीवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेंतर्गत विविध रिक्त असलेली पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भरत गोगावले (२८-१०-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

सदर रिक्त पदांचा कार्यभार, अतिरिक्त स्वरुपात अन्य अधिकारी यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

तसेच तात्पुरती व्यवस्था म्हणून वाहन चालक व शिपाई ही पदे विभागीय आयुक्त कार्यालयाचे आस्थापनेवर सेवासंलग्नतेने घेण्यात आलेले आहे. त्यामुळे विभागीय कार्यालयातील रिक्त असलेली पदे भरलेली नसल्याने ग्रामस्थस्तरावरील योजनांच्या अंमलबजावणीवर कुठलाही परिणाम होत नाही.

विभागीय कार्यालयातील रिक्त असलेली पदे भरण्याबाबत शासन स्तरावरुन आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

विदर्भातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मत्स्यव्यवसायाला अधिक लाभकारी आणि शाश्वत व्यवसाय पर्याय बनवण्याबाबत

(४७) १४३९७ (१९-०८-२०२५). डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली) : सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तलाव आणि नद्या असून यामध्ये मासेमारी करणारे समुदाय पारंपारिक पद्धतीने माशांचे उत्पन्न घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, कमी होणाऱ्या उत्पन्नामुळे तरुण पिढी या व्यवसायात कमी रस दाखवत असून शासनाने मत्स्यव्यवसायाला अधिक लाभकारी आणि शाश्वत व्यवसाय पर्याय बनविण्यासाठी काही योजना आखली आहे काय,
(३) असल्यास, आधुनिक मासेमारी करीता अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करता यावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. नितेश राणे (१३-१०-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.
विदर्भातील गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यांतील मच्छिमार पारंपारीक पद्धती सोबत आधुनिक पध्दतीने मत्स्यव्यवसाय करत आहेत.
(२) गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मच्छीमारांना मासे पकडण्यासाठी मत्स्यजाळी, लाकडी नौका, पत्रानौका, फायबर नौका यांना ५०% अनुदानाने नियमित पुरवठा करण्याची योजना कार्यरत आहे. शाश्वत मत्स्योत्पादन घेऊन या व्यवसायाला अधिक लाभकारी बनविण्यासाठी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेमार्फत जिल्ह्यांतील तरुणांकरिता, रोजगारभिमुख योजना राबविण्यात येत आहे.
(३) गडचिरोली, भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यामध्ये भुजलाशयीन बायोफ्लोक, रिसर्क्युलेटरी एक्वाकल्चर सिस्टम (RAS), पिंजरा मत्स्यसंवर्धन (Cage Culture) या मत्स्यसंवर्धनाच्या आधुनिक पध्दतीने, तंत्रज्ञानाचा वापर करुन शाश्वत मत्स्योत्पादन घेण्यासाठी योजना राबवून प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेअंतर्गत घटकयोजना राबवून तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी, शासनाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
तसेच मत्स्यव्यवसायास कृषि समकक्ष दर्जा दिला असून मच्छिमार बांधवांना अल्प मुदतीचा पत पुरवठा व वीजेच्या दरात सवलत देण्यासाठीची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

आंबेघर (ता.अलिबाग) येथील एका शेतक-याच्या शेतात काही धनदांडग्यानी भातशेती खरेदी करून त्यात भराव टाकुन पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद केल्याबाबत

(४८) १४५०० (१९-०८-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेघर (ता.अलिबाग) येथील श्री.किरण पाटील या शेतक-याच्या शेतात काही धनदांडग्यानी भातशेती खरेदी करून त्यात भराव टाकून पाण्याचे नैसर्गिक प्रवाह बंद केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त नैसर्गिक प्रवाह बंद करण्यात आल्यामुळे आजूबाजूच्या अन्य शेतकऱ्यांच्या शेतजमिनीत पाणी साठून पीकांची नासाडी होत असल्याबाबत तसेच रस्ते बंद झाल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक शेतकऱ्यांकडून तहसीलदार, अलिबाग यांच्याकडे वारंवार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त नुकसानीमुळे शेतकऱ्यांची उपासमार होत असल्यामुळे एका शेतकऱ्याने आत्महत्येचा इशारा तहसीलदार अलिबाग हयांना माहे जून, २०२५ मध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१०-१०-२०२५) : (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे.

श्री. किरण वामन पाटील यांनी दिनांक०१.०४.२०२४ रोजी त्यांच्या मौजे आंबेघर पाचांबे येथील स.क्र.२५/१ या शेतजमिनीच्या पूर्वेकडील भागामध्ये श्रीम. नीता जोशी आणि इतर यांनी मातीचा भराव टाकल्यामुळे पावसाळयात येणारे पाणी तुंबून त्यांचे शेती पिकाचे नुकसान झाल्याबाबत तक्रार अर्ज दिला होता.

त्याअनुषंगाने तहसिलदार, अलिबाग यांनी दिनांक १७.०६.२०२५ रोजी श्री. किरण वामन पाटील व इतर ६ शेतकरी यांची बैठक आयोजित केली व सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार व सर्वानुमतानुसार मंडळ अधिकारी चरी,

ग्राम महसूल अधिकारी चरी, तेथील रहिवाशी, इतर शेतकरी व पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थित दिनांक २७.०६.२०२५ रोजी पाणी जाण्याचा मार्गा करीता २ फुट रुंदीचा व खोली २ फुट व लांबी १६८ फुट या प्रमाणे सिमेंट पाईप टाकून नैसर्गिक पाणी जाण्याचा मार्ग मोकळा करण्यात आलेला आहे.

(३) व (४) सदर शेतकरी यांनी दिनांक२४.०४.२०२५ रोजी नुकसान भरपाई न मिळणेबाबत तहसिलदार, अलिबाग यांना अर्ज दिला आहे. त्याअनुषंगाने तालुका कृषी अधिकारी, अलिबाग यांनी सादर केलेल्या शेती नुकसान भरपाईबाबतची माहिती ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, ई-केवायसी झाल्यानंतर अर्जदार यांना शासनाकडून देय होणारी नुकसान भरपाई थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

जातनिहाय उपवर्गीकरणाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याबाबत

(४९) १४६०३ (१९-०८-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जातनिहाय उपवर्गीकरणासाठी शासनाने समिती नेमली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीचा अहवाल शासनास पुढील तीन महिन्यात सादर करण्यात येणार असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, जातनिहाय उपवर्गीकरणाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याकरिता सूचना व हरकती विचारात घेण्यात येणार आहे काय, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय शिरसाट (१५-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) राज्यातील अनुसूचित जातींच्या आरक्षणाचा उपवर्गीकरणाचा प्रारुप आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णय, दिनांक१५.१०.२०२४ अन्वये मा.न्या.श्री.अनंत मनोहर बदर (से.नि.), मा.उच्च न्यायालय, पाटणा यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस शासन निर्णय, दिनांक१२.०९.२०२५ अन्वये दिनांक१४.०३.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असुन प्रस्तुत प्रकरणी समितीस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे आव्हाणे (ता.जि.जळगाव) येथील जमिनीची बेकायदेशीर बिनशेती परवानगी रद्द करणेबाबत

(५०) १४६२२ (१९-०८-२०२५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) : सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आव्हाणे (जि.जळगाव) नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग या कार्यालयाने जिल्हाधिकारी जळगाव यांना दिनांक १७ फेब्रुवारी, २०१० रोजी वा त्या दरम्यान पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभागाने गट क्र.८५८ ला दिलेली बिनशेती परवानगी रद्द करण्याची शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निरीक्षक भूमी अभिलेख जळगाव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक ३ मार्च, २००९ रोजी पत्र दिले असून गट क्र.८५८ बाबत कार्यवाही करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तहसीलदार जळगाव यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिनांक ५ मार्च, २००९ रोजी पत्र देऊन बिनशेती आदेश रद्द होणे आवश्यक असल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त तहसीलदार यांनी उपविभागीय अधिकारी जळगाव यांना गट क्र.८५८ बाबत दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त गट क्रमांकाबाबत मा.उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.१०५६८/२०१२ मध्ये जिल्हाधिकारी जळगाव यांना प्रतिसाद केला नाही, असल्यास, मा.उच्च न्यायालयाने बिनशेती परवानगी रद्द करण्यास स्थगिती दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१७-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) होय, हे खरे आहे.

(६) सदर याचिका मा.न्यायालयात प्रलंबित असून सदर याचिकेत जिल्हाधिकारी, जळगांव व उपविभागीय अधिकारी, जळगांव यांनी प्रतिवादी करण्यात आलेले नाही.

(७) जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या दिनांक१६.११.२००२ च्या बिनशेती परवानगी आदेशामधील नमूद अट क्र.९ नुसार परवानगी धारकाने सदर आदेशाच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत जमीनीच्या बिनशेती प्रयोजनासाठी उपयोग करण्यास सुरुवात केली पाहिजे.

तथापि, सदर कालावधी वाढविणेकामी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अभिलेख्यात कुठलेही मुदतवाढ अर्ज प्राप्त झाले नसल्याने सदर आदेशातील अटीनुसार मौजे आव्हाणे ता.जि. जळगाव गट नं. ८५८ क्षेत्र २६२०० चौ.मी. पैकी १०८०५ चौ.मी वरील बिनशेती परवानगी आदेशाचे दिनांकाच्या १ वर्षानंतरच रद्द झाली आहे.

सदर गटाचे स्थळ पाहाणी केली असता त्यात मोठमोठी काटेरी झाडीझुडपे गवत उगवलेले दिसत आहे. बिनशेती झालेले क्षेत्रात कोणतेही बांधकाम दिसत नाही. तसेच सदर गटात कोणत्याही प्रकारचे रोड-रस्ते, गटारी या सुविधा नसून बिनशेती वापर दिसून आला नाही. या गटातील उर्वरित क्षेत्रात तुर या पिकाची लागवड केलेली दिसत आहे.

विधान भवन : **जितेंद्र भोळे**
नागपूर. **सचिव-१,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.